महाराष्ट्र वन विभाग

Pench Tiger Reserve MAHARASHTRA

महाराष्ट्र शासन

Office of the Executive Director, Pench Tiger Conservation Foundation, Nagpur
कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे कार्यालय
1 ला माळा, नविन प्रशासकीय इमारत, वनभवन शासकिय मुद्रणालयाजवळ, झिरो माइल्स जवळ नागपुर-440001
दुरध्वनी क्र. ०७१२ - २५६०७२७/२५६०७४८ Email ID:. edpenchfoundation@mahaforest.gov.in
Website: - www.mahapenchtiger.com Safari Booking / सफारी बुकींग: www.mahaecotourism.gov.in

क्रमांक:-पेटाकंफा/प्र.क्र.३१/विपजा/ 553 /२३-२४ नागपुर-४४०००१ दिनांक. 13/02/2024

# सुधारित जाहीरात

**विषय :-** पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर महाराष्ट्र पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) **सुधारीत** मुलाखतीची दिनांक व वेळ बाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र. पेटाकंफा/प्र. क्र. 31/विपजा/536/23-24 नागपूर-440001 दि.03/02/2024

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबत जाहिरात ही **http://www.mahaforest.nic.in** व **www.penchtigerreserve.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर दि. 07/02/2024 रोजी प्रकाशित करण्यात आलेली होती, व प्रत्यक्षमुलाखती करीता **दि.** 14/02/2024 रोजी या कार्यालयात उपस्थित राहण्यास्तव आदेश देण्यात आले होते, **दि.** 14/02/2024 **होणारी प्रत्यक्ष मुलाखत प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे. भरावयाचे पदाचे संदर्भात सविस्तर तपशिल वरील संकेस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहे. तसेच सुधारीत प्रत्यक्ष मुलाखत दि.** 26/02/2024 रोजी ठेवण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदांची मुलाखतीची वेळ व दिनांक वरील संकेतस्थळावर (Upload) करण्याकरिता या सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

(डॉ. प्रभु नाथ शुक्ल)
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर

**प्रती,**

श्री. योगेश काळे,
NIC Programmer,

**प्रतिलिपी:** - अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलिपी:** - उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

# जाहिरात दिलेल्या पदांची पदसंख्या, मानधन व मुलाखातीचे वेळापत्रक

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पद | मानधन |
|---|---|---|---|
| 1 | Veterinary Officer (पशु वैद्यकीय अधिकारी) | 1 | 50,000/- |
| 2 | Law Officer (कायदा अधिकारी) | 1 | 50,000/- |
| 3 | MSTrIPES Manager | 1 | 20,000/- |
| 4 | चाराकटर | 4 | 15,000/- |
| 5 | महावत | 4 | 25,000/- |

**टिप:-**

वैयक्तिक मुलाखतीसाठी येणाऱ्या उमेदवारांना कोणताही भत्ता (TA/DA) लागू राहणार नाही. उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखती करीता येतांना परिपूर्ण बायोडाटा (Resume) व अर्ज (Application) तसेच वरील प्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता बाबतचे दस्ताऐवज प्रमाणपत्रासह **दिनांक 26/02/2024 रोजी** खालील दिलेल्या तक्त्या वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प नागपुर यांचे कार्यालय, 1 ला माळा, नविन प्रशासकीय इमारत "वनभवन", शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल जवळ, नागपूर-440001 या पत्यावर प्रत्यक्ष मुलाखाती करीता उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक | कागदपत्र तपासणी | मुलाखातीची वेळ |
|---|---|---|---|---|
| 1. | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | 26/02/2024 | 10.30 ते 12.30 | दुपारी 12.00 ते 1.30 पर्यंत |
| 2 | Law Officer (कायदा अधिकारी) | | 10.30 ते 12.30 | दुपारी 01.45 ते 2.30 पर्यंत |
| 3 | MSTrIPES Manager | | 10.30 ते 12.30 | दुपारी 2.45 ते 3.30 पर्यंत |
| 4 | चाराकटर | | 10.30 ते 12.30 | दुपारी 3.45 ते 4.30 पर्यंत |
| 5 | महावत | | 10.30 ते 12.30 | दुपारी 4.45 ते 6.00 पर्यंत |

# जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणीक व अतिरिक्त पात्रता

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण पद | मानधन | मुख्यालय | आवश्यक शैक्षणीक पात्रता | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | 01 | 50,000/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | स्नातकोत्तरमध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठातून 60% गुणांसह पदव्युत्तर पदवी. वन्यजीव विषयासह पदव्युत्तर पदवी (एम.व्ही.एस.सी) ला प्राधान्य देण्यात येईल. | वन्यजीव, उपचार व हाताळण्याचा अनुभव. पशुवैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रातील किमान 3 वर्षांचा व्यावहारिक अनुभव. |
| 2 | Law Officer (कायदा अधिकारी) | 01 | 50000/- | वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाने घेतलेली अखिल भारतीय बार परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यांनी ॲडव्होकेट्स ॲक्टनुसार राज्य बार कौन्सिलमध्ये वकिल म्हणून नोंदणी केलेली पाहिजे. शैक्षणिक अर्हता व अनुभव<br>1. मान्यता प्राप्त विद्यापीठातून कायद्याचा पदवीधर व सनदधारक.<br>2. जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे अधिकारी या शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले असावा.<br>3. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याचे दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.<br>4. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही साक्ष झालेली नसावी.<br>5. उमेदवार वन विषयक, फौजदारी व दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबीत ज्ञान संपन्न असावा.<br>6. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. | नागपूर प्रादेशिक वनवृत्तांगत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया या वनविभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)-पुर्व, नागपूर व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व वन्यजीव विभागातील आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर कार्यालयातील जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी. वनविभागाचे न्यायालयीन प्रकरण हाताळण्याचे किमान 3 वर्षांचा अनुभव. |
| 3 | MSTrIPES Manager | 01 | 20000/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | कोणत्याही शाखेतील पदवीधर आणि एमएससीआयटी उत्तीर्ण, टंकलेखन गती-40 शप्रमी (इंग्रजी) 30 शप्रमी मराठी / हिंदी (मान्यताप्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक) | MSTrIPES, वन्यजीव सनियंत्रण व वन्यजीव संवर्धन कामामध्ये उत्तम अनुभव आवश्यक. |
| 4 | चाराकटर | 4 | 15000/- | चोरबाहुली (वन्यजीव) वनपरिक्षेत्र | किमान माध्यमिक शाळा उत्तीण व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. | हत्ती हाताळण्याचे पुरेसे अनुभव असावे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | महावत | 4 | 25000/- | चोरबाहुली (वन्यजीव) वनपरिक्षेत्र | किमान माध्यमिक शाळा उत्तीर्ण व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. | हत्ती हाताळण्याचे पुरेसे अनुभव असावे. |

टिप: -

1. सर्व पदांना मराठीचे पुरेसे ज्ञान (वाचन, लिहीणे, बोलणे) अत्यावश्यक आहे.
2. वरील तक्त्यातील दर्शविलेल्या मुख्यालया व्यतीरिक्त निवड झालेल्या उमेदवारास कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यक्षेत्रा मधील ईतर कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.
3. पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदाकरिता बायोडाटा (Resume) व अर्ज (Application) तसेच वरील प्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता बाबतचे दस्ताऐवज मुलाखतीच्या वेळेस दाखविण्यात यावे.
4. उमेदवार हा कोणत्याही इतर शासकिय, निमशासकिय अशासकीय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकरी असता कामा नये.
5. सदर पदे ही पूर्णवेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/प्रॅक्टीस करता येणार नाही.
6. नियुक्ती झालेल्या महावत व चाराकटर सदस्यास 24 तास सेवे करीता तत्पर राहणे बंधनकारक राहील. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे आदेशान्वये पेंच व्याघ्र प्रकल्प कार्यक्षेत्राबाहेर व कोणत्याही ठिकाणी कार्य करावे लागेल.

वरिल अ.क्र. 1, 2 व 3 या पदांना संगणकाचे पुरेसे ज्ञान अत्यावश्यक/आवश्यक आहे.

(डॉ. प्रभु नाथ शुक्ल)
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,
नागपुर